**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या जिल्हा परिषद निवडणुका १५ फेब्रुवारीपर्यंत घेण्यास सर्वोच्च न्यायालयाची परवानगी.**
2. **नागपूर महानगर पालिकेच्या निवडणुकीत ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदार, आणि गर्भवती महिलांना प्राधान्याने मतदान करता येणार.**
3. **राजमाता जिजाऊंच्या जयंती निमित्त सिंदखेडराजा इथं राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न.**
4. **विदर्भ साहित्य संघाचा शतकोत्तर तिसरा वर्धापन दिन सोहळा 14 जानेवारी रोजी होणार.**

---

जिल्हा परिषदा

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं आज दिली. मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय अडचणी यासारखी कारणं देत राज्य निवडणूक आयोगानं ३१ जानेवारीची मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी विनंती केली होती. आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हापरिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. उर्वरित २० जिल्हापरिषदांच्या निवडणुकांच्या संदर्भात २१ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे.

---

आयुक्त डॉ.अभिजित चौधरी

ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या गृह मतदानाबद्दल राज्य निवडणूक आयोगामार्फत कोणत्याही सूचना प्राप्त झाल्या नाही, त्यामुळे गृह मतदानाची सोय करण्यात आलेली नाही. मात्र ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदार, गर्भवती महिला यांना प्राधान्याने मतदान करता येईल. त्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मदतीसाठी राहणार आहेत अशी माहिती नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी आज वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. 15

जानेवारी रोजी होणाऱ्या नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महानगरपालिकेत पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकूण 38 प्रभाग आहेत. मतदारांनी ३७ प्रभागांमध्ये ४ उमेदवारांना मत द्यायचं आहे तर केवळ एकाच प्रभागात तीन सदस्यीय मतदान होणार आहे. एकूण मतदान केंद्र संख्या 3004 असून संवेदनशील मतदान केंद्र 321 आहेत. 151 सदस्य संख्या असलेल्या नागपूर महानगरपालिकेसाठी निवडणुकीत एकूण 993 उमेदवार रिंगणात उभे आहेत. एकूण 255 मतदान केंद्रावर वेब कास्टिंग करण्यात येईल असं प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितलं. शुक्रवार दिनांक 16 जानेवारी रोजी सकाळी दहा वाजेपासून दहा मतमोजणी केंद्रांवर मतमोजणीची प्रक्रिया सुरू होईल असं ते म्हणाले -

***(होल्ड बाईट - डॉ.अभिजीत चौधरी २३ सेकंद)***

***साधारणतः प्रत्येक मतमोजणी केंद्रामध्ये वीस टेबल्स हे ईव्हीएम च्या मतांच्या मोजणीसाठी असणार आहे आणि चार टेबल्स हे पोस्टल बॅलेट साठी असणारे. त्यासाठी आवश्यक असणारा मनुष्यबळ नियुक्त केला गेला आहे. त्याचे ट्रेनिंग जे आहे ते सुरू आहे. चौदा तारखेला आपण एक ट्रेनिंग जी आहे ती आपण संध्याकाळी आयोजित केलेलं आहे. मीडिया कक्ष हा सगळीकडे स्थापन करणार आहोत. सर्व ज्या काउंटिंग सेंटर आहे तिथे मीडिया कक्ष स्थापन होईल.***

मतदारांना त्यांचं नाव, आणि मतदान केंद्र हे मताधिकार ॲप द्वारा शोधता येऊ शकते. त्याचप्रमाणे माय नागपूर आणि मनपाच्या संकेतस्थळावर देखील ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

---------------------------------------------

अमरावती महानगरपालिका

अमरावती महानगरपालिकेसाठीची निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरळीत आणि शांततेत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून व्यापक तयारी सुरू आहे. या अनुषंगाने निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज शहरातील विविध मतदान केंद्रांच्या नियोजनाची प्रत्यक्ष पाहणी केली. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, तसेच मतदान प्रक्रिया पूर्णतः नियमबद्ध आणि वेळेत पार पडावी, यासाठी सर्व बाबींची काटेकोर तपासणी करण्यात आली.

---------------------------------------------

स्वीप उपक्रम

स्वीप उपक्रमांतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे आयोजित आंतरशालेय चित्रकला आणि आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आयुक्त अकुनुरी नरेश यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आलं . या स्पर्धांमध्ये सुमारे ७० मनपा तसंच खासगी शाळा आणि महाविद्यालयांचा सहभाग होता. चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धे द्वारा विद्यार्थ्यांनी मतदानाविषयी जनजागृती केली होती.

---------------------------------------------

मतदान आवाहन

आगामी महानगर पालिकांच्या पार्श्वभूमीवर नागपूरचे पाककृती विक्रमवीर यांनी नगपूरकरांना मतदानाचा विश्वविक्रम नोंदविण्याचं आवाहन केलं आहे.....

***(होल्ड बाइट -विष्णु मनोहर 34 सेकंद)***

***आपल्या शरीरासाठी जसं व्यायाम महत्त्वाचा असतो, तसंच आपल्या देशासाठी आपलं एक मत खूप महत्वाचं असतं आणि माझी अशी इच्छा आहे की सगळ्यांनी मतदान करा नुसतं तुम्ही करू नका. तुमच्या घरच्या मंडळींना घरातून बाहेर काढून त्यांना घेऊन जा. आजूबाजूच्या मंडळींना जागृत करा की मतदान करा. तुमचं एक मत हे देशाचं भवितव्य बदलू शकत आणि ज्या पद्धतीने आत्तापर्यंत मी वेगवेगळे वर्ल्ड रेकॉर्ड केले तर मला असं वाटतं की आपल्या नागपूरचा सुद्धा एक वर्ल्ड रेकॉर्ड व्हावा तो जास्तीत जास्त मतदारांनी मत दिल्याचा. तर हा रेकॉर्ड करायला तुम्ही सज्ज आहात ना? नक्की सज्ज व्हा.***

---------------------------------------------

प्रचार कालावधी

आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या २०२५-२६ च्या अनुषंगाने मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, मतदानाच्या ४८ तास आधी म्हणजे उद्या मंगळवार दिनांक १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता निवडणूक प्रचार-प्रसाराचा कालावधी संपणार आहे. हा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही प्रकारची निवडणूकविषयक जाहिरात प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नसल्याचे स्पष्ट निर्देश राज्य निवडणूक आयोगान दिले आहेत.

---------------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे-पत्र परिषद

विकासाचा अजेंडा बाजूला ठेवून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे भावनिक मुद्द्यांवर बोलत जनतेमध्ये संभ्रम निर्माण करत असल्याची टीका राज्याचे महसूल मंत्री आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केली. ते आज नागपुरात

वार्ताहरांशी बोलत होते. ठाकरे बंधूंच्या प्रचाराची दिशा चुकलेली असून त्यांच्या पक्षाच्या अधोगतीस तेच कारण असल्याचा टोला त्यांनी लगावला. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात मांडला जाईल तसंच 'लाडकी बहीण' योजना नियमित असून आचारसंहितेचा भंग होत नाही, ती बंद होणार नाही, असही बावनकुळे यांनी सांगितल.

-------------------------------------------

राजमाता जिजाऊ जयंती

राजमाता जिजाऊंची आज ४२८वी जयंती उत्साहात साजरी होत आहे. बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथं राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात असलेल्या जिजाऊंच्या जन्मस्थळी सूर्योदयाच्या वेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली. यावेळी राजे लखुजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, आमदार मनोज कायंदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यासाठी राज्यभरातून शिवप्रेमी आणि जिजाऊ भक्त मोठ्या संख्येने सिंदखेडराजा इथं दाखल झाले आहेत. गृहमंत्री अमित शहा यांनी राजमाता जिजाऊंना आदरांजली वाहिली. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत राजामाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं

-------------------------------------------

नायलॉन मांजा

नायलॉन मांजामुळे गंभीर दुखापत अपघात किंवा एखाद्याचा जीव सुद्धा जाऊ शकतो. मांजा हा प्रवासी, नागरिक, दुचाकी स्वार आणि पक्षांच्या जीवितांसाठी घातक आहे. नागरिकांनी नायलॉन मांजा वापरू नये याबाबत नागपूर शहर पोलिसांच्या वतीने आज जनजागृती करण्यात आली. संविधान चौक येथे पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र कुमार सिंघल, सह पोलीस आयुक्त लोहित मतानी यांच्या हस्ते तसेच नागपूर पोलीस दलाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हस्ते दुचाकी वाहनांवर नायलॉन मांजापासून संरक्षणासाठी अँटी नायलॉन मांजा फ्रेम्स बसविण्यात आल्या. तसेच दुचाकीस्वारांना नायलॉन मांजापासून बचावासाठी नेक स्कार्फ्सचेही वितरण करण्यात आले. संपूर्ण शहरात ही जनजागृती मोहीम राबविण्यात येत असल्याच पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंघल यांनी सांगितलं -

***(होल्ड बाईट - डॉ.रविंद्रकुमार सिंघल २९ सेकंद)***

***नागपुर शहर में बहुत एक अच्छी मोहीम शुरू की है, क्योंकि हम सबको मालूम है कि आने वाले चार-पांच दिनों के बाद में यहां पे संक्रांति का त्यौहार है और बहुत सारे बच्चे और कुछ युवा लोग पतंग उड़ाते हैं। पर पतंग उड़ाते समय उसके बाद में***

***जो मांजा यूज होता है, उससे काफी एक्सीडेंट्स होते हैं। तो हम लोग यही सब लोगों से आह्वान कर रहे हैं। एक तो नायलॉन मांजा जो है, उसका उपयोग बिल्कुल ना करें। इसके अलावा जो हमारे टू व्हीलर्स पे जो चलते हैं, साइकिल हो, मोटरसाइकिल हो, स्कूटर हो, उसमें उन्हें प्रोटेक्शन यूज करनी चाहिए।***

--------------------------------------------

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचा 103 वा वर्धापन दिन सोहळा आणि वाङ्मय पुरस्कार वितरण सोहळा मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर, बुधवार दिनांक 14 जानेवारी रोजी संध्याकाळी 5 वाजता विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात आयोजित करण्यात आला आहे. विदर्भ साहित्य संघाच्या ७० शाखा आणि हजारो सभासदांच्या सहकार्यातून हा शतकोत्तर तृतीय वर्धापन दिन सोहळा संपन्न होत आहे. यावेळी साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याऱ्या साहित्यिकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मयचे संपादक डॉ.सुनीलकुमार लवटे आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी उपस्थित राहणार आहेत. सर्व प्रकारच्या वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था सेवासदन शाळेच्या प्रांगणात करण्यात आली असून या समारंभाला साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येन उपस्थित राहाव, अस आवाहन विदर्भ साहित्य संघातर्फे करण्यात आल आहे.

--------------------------------------------

युवा दिन -विदर्भ

यवतमाळच्या सामका आयुर्वेद इथं  स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या भव्य पुतळ्याच अनावरण करण्यात आल. नागपूर तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाशेजारी स्वामी विवेकानंद यांच्या या अठरा फूट उंच पुतळ्याचं  अनावरण रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी राघवेन्द्रानंद महाराज यांच्या उपस्थितीत झालं . लवकरच इथं सुसज्ज अशा स्मारकाची निर्मिती होणार असून या ठिकाणाहून युवकांना प्रेरणादायी विचार मिळावे या दृष्टीने उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र आणि  अन्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संकल्प दौडमध्ये अमरावतीतील शेकडो शालेय आणि  महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी  सहभाग घेतला.

--------------------------------------------

हवामान

विदर्भात आज गोंदिया इथं ९.५ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. तर नागपुरात आज १०.२ अंश सेल्सियस इतकं किमान तापमान नोंदविण्यात आलं.

-----------------------------------------------